F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल–desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे**

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/३७
दिनांक :- १४ / ०२ /२०२३

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रलंबित असलेल्या (विद्यार्थी/संस्था/विभागीय कार्यालय स्तरांवर) अर्जांवरील कार्यवाहीबाबत ........**

संदर्भ :
१. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २२७ दि.२४ /०८/२०२२
२. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २४४ दि.२९ /०९/२०२२
३. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २७० दि.०१ /११/२०२२
४. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची विभागीय कार्यालयांसोबतची दूरदृष्य बैठक दि.२९, ३०/११/२०२२
५. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ ०५ दि.११/०१ /२०२३
६. मा.प्र.संचालक तंत्रशिक्षण, मुंबई म.रा.यांची विभागीय सहसंचालकांसोबत बैठक दि.१३/०२/२०२३

सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** ( संकेतस्थळ - www.mahadbtmahait.gov.in ) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**महाडीबीटी पोर्टलद्वारे** तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या, उपरोक्त योजनांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या अंमलबजावणीबाबत संदर्भ क्र. १,२,३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र.४ च्या विभागीय कार्यालयांसोबत घेण्यात आलेल्या दूरदृष्य बैठकीमध्ये व संदर्भ क्र. ५ च्या पत्राद्वारे देखील, डीबीटी पोर्टलवरील सदर योजनांचे संस्था स्तरांवर ( **Pending at Institute अंतर्गत** ) प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते.

तसेच विभागीय कार्यालयांनी डीबीटी पोर्टलवर त्यांच्या लॉगीन आयडी चा वापर करुन करुन, योजना निहाय व वर्ष निहाय अर्जांच्या सद्य स्थितीच्या तपशीलामध्ये ज्या संस्था अंतर्गत उपरोक्त योजनांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित ( **Pending at Institute अंतर्गत** ) आहेत, त्या संस्थासोबत आढावा बैठक घेऊन अशा संस्थांना त्यांच्या लॉगीन अंतर्गत तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी

करुन **तात्काळ निकाली** ( मंजूर / नामंजूर ) काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते. तसेच वेळोवेळी संस्थास्तरांवर प्राप्त होणारे अर्ज संस्थांनी प्रलंबित न ठेवता तात्काळ निकाली काढण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

तरी, सोबत जोडलेल्या **दि. १० /०२/२०२३ च्या** डीबीटी डॅशबोर्डनुसार (Annex-१), विभागनिहाय, योजना निहाय व वर्ष निहाय अर्जांच्या सद्य स्थितीच्या तपशीलामध्ये प्रलंबित असलेल्या अर्जांची संख्या दिली आहे, जे आपल्या लॉगीनमध्ये वर्षनिहाय उपलब्ध आहे. [ अहवालात संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज ( **Sent back अंतर्गत** ), संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित ( **Pending at Institute अंतर्गत** ) व विभागीय कार्यालय स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित ( **Pending at Department अंतर्गत** ) इ. अर्जाबाबतच्या तपशीलाचे अवलोकन करावे.] तसेच वर्षनिहाय, योजनानिहाय, अलॉटेड व बील जनरेटेड **दि.१० /०२/२०२३ च्या** डीबीटी डॅशबोर्डचा अहवाल (Annex-२) आपल्या माहितीसाठी सोबत जोडला आहे.

तरी, संदर्भ क्र.६ च्या विभागीय सहसंचालकांच्या आढावा बैठकीमध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार, सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, योजनेसाठी अर्जदार विद्यार्थ्यांच्या प्रलंबित अर्जांबाबत [ संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज ( **Sent back अंतर्गत** ), संस्था स्तरांवर तपासणीसाठी ( **Pending at Institute अंतर्गत** )] कळवावे व सदर प्रलंबित अर्ज यापूर्वी दिलेल्या सूचनांनुसार व संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन **दि.१७/०२/२०२३ पर्यंत** निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढण्याबाबत कळविण्यात यावे.

तसेच, विभागीय कार्यालयांना वारंवार या कार्यालयाकडून सूचित करावे लागत आहे. तरी विभागीय कार्यालयांनी स्वत:हून त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असलेल्या डीबीटी डॅशबोर्डचे ठराविक कालावधीच्या अंतराने अवलोकन करुन डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार संस्था स्तरांवर जी कार्यवाही प्रलंबित आहे ती कार्यवाही संस्थांकडून पूर्ण करुन घ्यावी आणि जी संस्था कार्यवाही पूर्ण करणार नाही त्यांना नोटीस देऊन पूर्ण करण्याबाबत सूचित करावे.जेणेकरुन संस्था स्तरांवर प्रलंबित असलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय कार्यालयांना वारंवार या कार्यालयाकडून सूचित करावे लागणार नाही.

**तसेच विभागीय कार्यालयांनी देखील** डीबीटी पोर्टलवर विभागीय कार्यालयाच्या लॉगीन आयडीमध्ये उपरोक्त योजनांचे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त होत असलेले संस्थास्तरावर मंजूर झालेले अर्ज (**Pending at Departmentअंतर्गत**) प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन **दि. २४/०२/२०२३ पर्यंत** निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढून पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे. जेणेकरुन मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद खर्च करता येईल.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षणविभागीयकार्यालय, नागपूर

तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२२-२३/ 634 दिनांकः- 15 FEB 2023

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :-डीबीटी पोर्टलव्दारे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्याबाबत तसेच संस्थांच्या लॉगीन ला प्रलंबित असलेले अर्ज दि. १६/०२/२०२३ पर्यंत निकाली काढण्याबाबत.

संदर्भः- मा. संचालक, तंशिसं,म.रा.मुंबई, यांचे कार्यासन क्र. १८ / तंशिसं / डीबीटी/ विकाप/२०२२-२३/३७ दि. १४/०२/२०२३

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, महाडिबीटी पोर्टलव्दारेविद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज (नवीन /नुतनीकरण ) या विभागातर्गत येत असलेल्या संस्थांच्या लॉगीन ला , सद्यस्थितीत संस्था व विद्यार्थ्यांच्या लॉगीन मिळून **एकुण ४९३६** विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित आहे.

त्याअनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता निधी प्राप्त झालेला असून शिष्यवृत्ती करीता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना सदर निधी वितरीत करावयाचा असलयाने , आपल्या संस्थेतील शिकणा-या पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे डीबीटी पोर्टलवरील संस्था व विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज (नवीन/नुतनीकरण) तपासणी करून **दि. १६/०२/२०२३ पर्यत** निकाली काढावेत यावे. जेणे करून मंजूर अर्थसंकल्पिय तरतुद खर्च करता येईल. **तसेच प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जावर न केलेल्या कार्यवाही मुळे विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहील्यास , याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य / संस्था प्रमुखाची राहील .**

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर